दुतियो पाठो ।

# चन्दा थेरी ।

प्राचीनकालीन महिलांच्या स्वातंत्र्याचा दस्तावेज म्हणून संबोधलेल्या 'थेरीगाथा' ग्रंथातून प्रस्तुत कविता घेतली आहे. चन्दा थेरीचा जन्म एका अत्यंत दरिद्री कुळात झाला. तिचे लहानपण फारच दुक्खात गेले. जेव्हा ती तारुण्यात आली तेव्हा तिचे सर्व आप्तसंबंधी एका भयंकर रोगाने मृत्यू पावले. चन्दा निराधार झाल्याने भिक्षा मागून उपजीविका करीत होती. भिक्षा मागत मागत एकदा ती भिक्खूणी पटाचाराजवळ आली, तेव्हा भिक्खूणी पटाचाराचे भोजन संपलेले होते. परंतु भिक्खूणी पटाचाराने तिच्या भोजनाची व्यवस्था केली. तेव्हा चन्दा, भिक्खूणी पटाचारा, भिक्खूचे जीवन व आचरण पाहून प्रभावित झाली. त्यानंतर चन्दा, भिक्खूणी पटाचारासोबत राहू लागली. काही दिवसांनंतर चन्दा भिक्खूणी झाली. भिक्खूणी चन्दाने आपल्या पूर्वजीवनाचे वर्णन करताना खालील गाथा म्हटल्या आहेत.



दुग्गताहं पुरे आसिं, विधवा च अपुत्तिका ।
विना मित्तेहि ञातिहि, भत्तचोळस्स नाधिगं ।।१।।

पत्तं दण्डं च गण्हित्वा, भिक्खमाना कुला कुलं ।
सीतुण्हेन, च डय्हन्ती, सत्त वस्सानि चारिहं ।।२।।

भिक्खुणि पुन दिस्वान, अन्नपानस्स लाभिनिं ।
उपसङ्कम्म अवोच, पब्बज्जं अनगारियं ।।३।।

सा च मं अनुकम्पाय, पब्बाजेसि पटाचारा ।
ततो मं ओवदित्वान, परमत्थे नियोजयि ।।४।।

तस्साहं वचनं सुत्वा, अकासिं अनुसासनिं ।
अमोघो अय्या ओवादो, तेविज्जाम्हि अनासवा' ति ।।५।।

*(थेरीगाथा)*

## सद्दत्थ (शब्दार्थ)

**दुग्गताहं** (दुग्गतं+अहं) - माझी दुरवस्था
**दुग्गति** (स्त्री.) - दुर्गती
**अपुत्तिक** - पुत्रहीन, निपुत्रिक
**उपसङ्कम्म** - जवळ जाणे
**अवोच** - म्हणाले
**पब्बज्जा** - प्रव्रज्या
**अनगारिय** - बेघर
**अनुकम्पा** - अनुकंपा, दया करणे
**ततो** (अ.) - तेथून
**ओवादित्वान** (अ.) - उपदेश ऐकून
**नियोजयि** - प्रेरित केले
**तस्साहं** (तस्स+अहं) - मी त्याचा
**सुत्वा** (त्वान्त अ.) - ऐकून
**अकासि** - पूर्ण केले
**अमोघ** (वि.) - प्रयोजनपूर्वक, प्रयोजनयुक्त
**अय्याओवाद** (अय्या+ओवाद) - श्रेष्ठ स्त्रीचा उपदेश
**अय्या** (स्त्री.) - महान स्त्री, श्रेष्ठ स्त्री
**अन्नपान** - जेवणपाणी
**लाभ** - प्राप्त होणे
**पुरे** (क्रि.वि.) - पूर्वी, पूर्वतर
**असिं** (क्रि.) - (मी) होते
**विना** (अ.) - रहित
**मित्त** (पुं.) - मित्र
**भत्त** (नपुं.) - भात
**चोळ** (पुं.) - वस्त्र
**नाधिगं** - मला मिळत नव्हते
**पत्त** (नपुं.) - पात्र
**दण्ड** (पुं.) - काठी
**गहित्वा** (त्वान्त अ.) - हातात धरून
**भिक्खमान** - भिक्षा मागणे
**कुल** (नपुं.) - कुटुंब
**सीतुण्ह** (सीत+उण्ह) - थंडी, ऊन
**डय्ह** (डय्हति) (क्रि.) - जाळणे
**चारिहं** (चारि+अहं) - मी फिरत होते
**पुन** (अ.) - नंतर, एकदिवस
**दिस्वान** - पाहून
**तेविज्जा** - तीन विद्यायुक्त
**अनावस** (वि.) - चित्तमलरहित

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची मराठीमध्ये उत्तरे लिहा.**

(१) भिक्खूणी होण्यापूर्वीच्या चन्दाथेरीच्या जीवनाचे वर्णन करा.
(२) चन्दाला कोणी भोजन दिले ?
(३) चन्दाने पटाचाराला कोणती विनंती केली ?
(४) चन्दाने भिक्खूणी झाल्यानंतर काय केले ?

**२. संधी विग्रह करा.**

दुग्गताहं, सीतुण्हेन, चारिहं, तस्साहं

**टिपणे**

- धम्मविचाराने स्त्रियांना आधार देऊन कल्याणकारी ज्ञानप्राप्तीचा मार्ग मोकळा केला.
- बुद्धकालीन भिक्खूणींचे स्वकथन वाचावे.

★★★